पुणे शहर पोलीस

# दर्पण

## ऑगस्ट २०१९

# अभिप्राय...

## स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे शहर

### दर्पण पुस्तीका अभिप्राय

१)पोलीस कर्मचारी यांचे संपुर्ण नाव : गणेश सुभाष खांडेकर

२)पदनाम : पोलिस शिपाई

३)बक्कल नंबर : 8814

४)नेमणुकीचे ठिकाण / पो स्टे : स्वारगेट पो.स्टे. पुणे

५)दर्पण पुस्तीकेबाबत आपला प्रतिक्रीयात्मक अभिप्राय/मत -

दर्पण या पुस्तकातील माहिती पोलिसांसाठी खूप छान लिहिलेली आहे, या पुस्तकात पोलीस खात्याबद्दलची माहिती वाचायला मिळते तसेच पोलिसांनी केलेली काम याची माहिती दर्पण या पुस्तकातून अतिशय समर्पक रित्या सांगितलेली आहे।

तसेच या पुस्तकातील माहिती ही आमच्यासाठी तसेच आमच्या कामात तिचा चांगला उपयोग होत असून ती अतिशय महत्वाची आहे.

दिनांक 24/08/2019

स्वाक्षरी PC8814

---

प्रति,

मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो,
विश्रांतवाडी पो.स्टे. पुणे शहर

प्रतिवेदक :- एम.डी. वाळके म.पो. उप.निरीक्षक.
विश्रांतवाडी पो.स्टे. पुणे शहर.

विषय :- दर्पण पुस्तिकेचे अभिप्राय बाबत.

=== o ===

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर करते की मा. पोलीस आयुक्त पुणे शहर. यांनी त्यांचे संकल्पनेतून प्रसार करण्यात आलेली 'दर्पण' पुस्तिकेचे आम्ही नियमित वाचन करीत आहोत. त्यामुळे आम्हाला पोलीसांकडून केलेल्या चांगल्या कामगिरी बाबत माहिती मिळून त्याप्रमाणे कार्य करण्यात आम्हाला प्रोत्साहन मिळत आहे.

आम्ही. स्टेशन हाऊस येथे पोलीस ठाण्याकडील 'दर्पण' पुस्तिका ही ठेवून आहोत पो.स्टे येथे येणाऱ्या अर्जदार व नागरिकांनी वाचण्यास देऊन सदर पुस्तिकेमुळे नागरिकांच्या मनात पोलीसांबाबत चांगली प्रतिमा निर्माण होण्यास मदत होत आहे.

मा. सादर व्हावे

म. पोलीस उप. निरीक्षक
वि.वाडी पो.स्टे पुणे.

# वाहतुक सुलभता

लोकसत्ता – दि. १८ ऑगस्ट, २०१९

# वाहतूक स्वयंसेवकांच्या पाटीवर कौतुकाची थाप



प्रभा नेने यांचा सत्कार करताना भूषण गोखले



राम पाटील यांचा सत्कार करताना राजीव सहस्रबुद्धे



तीर्थराज भाटिया यांचा सत्कार करताना अनिल नलावडे

**प्रतिनिधी, पुणे**

**वाहतुकीचे नियम** सर्वांना ठाऊक आहेत. ते आपल्या हितासाठीच आहेत हे माहीत असतानाही नियमांचे पालन करण्याच्या मनोवृत्तीचा नागरिकांमध्ये अभाव जाणवतो. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांमध्ये सुशिक्षितांचे वाढते प्रमाण ही चिंतेची बाब आहे... गेल्या अनेक वर्षांपासून शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी आपल्या परीने खारीचा वाटा उचलत वाहतूक स्वयंसेवक म्हणून आपली कामगिरी चोखपणाने पार पाडणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचे हे निरीक्षण आहे. 'हे काम आमच्यासाठी वसा आहे. त्यामुळे कितीही अपमान सहन करावा लागला तरी घेतला वसा टाकणार नाही', अशी भावनाही या ज्येष्ठ वाहतूक स्वयंसेवकांनी 'लोकसत्ता'शी बोलताना व्यक्त केली.

वाहतूक नियमांबाबत प्रबोधन करण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे सामाजिक रक्षाबंधन उपक्रमात वाहतूक सुरक्षा अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानाअंतर्गत महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीतर्फे आयोजित कार्यक्रमात वाहतूक नियम पालनाची शपथ घेण्यात आली, तसेच या वाहतूक स्वयंसेवकांचा सत्कार करण्यात आला.

पूलगेट आणि वानवडी परिसरात वाहतुकीला शिस्त लावण्याचा प्रयत्न करणारे ऐंशी वर्षांचे तीर्थराज भाटिया, सिम्बायोसिस प्रायमरी स्कूल आणि कोथरूडच्या परांजपे स्कूल येथे शाळा भरण्याच्या आणि सुटण्याच्या

**रविवारची बातमी**

वेळेस मुलांना सुरळीतपणे जाता यावे यासाठी कार्यरत असलेल्या सत्तरी पार केलेल्या प्रभा नेने ऊर्फ नेनेआजी आणि टिळक रस्त्यावर महाराष्ट्र साहित्य परिषद येथील चौकात गेल्या दशकापासून गर्दीच्या वेळी वाहतूक नियंत्रण करणारे पन्नाशी पार केलेले राम पाटील या वाहतूक स्वयंसेवकांचा त्यांच्या योगदानाबद्दल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष एअर मार्शल (निवृत्त) भूषण गोखले, संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष राजीव सहस्रबुद्धे आणि वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल नलावडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सतत वर्दळीच्या असलेल्या टिळक रस्त्यावर वाहतूक नियंत्रित करण्यासाठी सामान्य नागरिक म्हणून मी छोटासा प्रयत्न करतो. सिग्नलला दोन मिनिटे थांबण्याचाही लोकांकडे संयम नसतो. काही करून आपली गाडी पुढे कशी दामटता येईल, अशीच सर्वांची कृती असते. त्यामुळे कितीही नियम केले तरी या भागातील वाहतूक कोंडी दूर होत नाही, याकडे राम पाटील यांनी लक्ष वेधले. काही लोक समजावून सांगितले तर ऐकतात. काहीजण उलट उत्तरे देत वाद घालतात. कोणतेही अधिकार नसल्यामुळे काही बोलण्याची सोय नाही. पोलीस चौकी आणि न्यायालयात जाण्यासाठी वेळ असलेल्या लोकांचे नियमांचे पालन करण्याकडे मात्र दुर्लक्ष होत असते, अशी टिप्पणी पाटील यांनी केली.

नगर रस्त्यावरील इंटरनॅशनल कॉम्प्युटर्स येथून निवृत्त झालेल्या प्रभा नेने यांनी 'निर्धार ट्रस्ट'च्या माध्यमातून वाहतूक या प्रश्नावर काम करण्यास सुरुवात केली. वाहतुकीचे नियम माहीत असूनही त्यांचे पालन करण्याची मनोवृत्ती दिसत नाही. नियमांचे उल्लंघन करण्यामध्ये सुशिक्षितांची संख्या वाढत असून ही चिंतेची बाब असल्याचे नेने यांनी सांगितले. वाहतुकीचे नियंत्रण करताना बरे-वाईट अनुभव येतात. पण, या कामाची आवड असल्याने नाऊमेद न होता ऊर्जा संपादन करण्यासाठी मी रस्त्यावर उभी राहते. शालेय विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी शाळा भरण्याच्या आणि सुटण्याच्या वेळेस किमान अर्धा तास तरी आम्ही 'स्कूल गेट कॉलेंटियर' उपक्रम राबवितो, असे त्यांनी सांगितले.

वयाच्या ऐंशीव्या वर्षी मी पूलगेट आणि वानवडी परिसरातील रस्त्यांवर उभा असतो, असे तीर्थराज भाटिया यांनी सांगितले. माझा जन्म सिंध प्रांतातील. फाळणी झाल्यानंतर १९४७ मध्ये मी मुंबईला आणि नंतर पुण्याला आलो. रेडिओ दुरुस्ती हा माझ्या उपजीविकेचा व्यवसाय होता. अविवाहित असल्यामुळे गरजा कमी आहेत, असे त्यांनी सांगितले. 'जिंदगीमें कुछ अच्छे लोग होते है तो कुछ बुरे लोगभी होते है, मैं लोगोंको अनुशासन बताता हूँ, लेकिन सबसे तेज चलाने की आदत से मजबूर जवान छोकरे सुनते नहीं', अशा शब्दांत भाटिया यांनी वास्तवावर बोट ठेवले.

पुढारी – दि. २० ऑगस्ट, २०१९

# हेल्मेटमुळे वाचले वाहतूक पोलिसांचे प्राण

**पुणे : प्रतिनिधी**

दुचाकी घसरून पडलेल्या पोलिस कर्मचाऱ्याच्या डोक्यावरून चारचाकी रिक्षाचे (छोटा हत्ती) चाक जाऊनही केवळ डोक्यावर हेल्मेट असल्यामुळे प्राण वाचले. लक्ष्मण बांगर असे पोलिस नाईक पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याचे नाव आहे.

बांगर हे बंडगार्डन वाहतूक विभागात कार्यरत असून, बुधवारी (दि.१४) दुपारी सव्वातीनच्या दरम्यान पोलिस आयुक्तालयातून शासकीय कामाचे टपाल घेऊन दुचाकीवरून बंडगार्डन वाहतूक विभागाकडे निघाले होते. रेसिडेन्सिल क्लब आयबी चौक या ठिकाणी ते आले असताना त्यांच्या दुचाकीला अचानक एक सायकलस्वार आडवा आला. त्यावेळी त्याला वाचवण्याच्या नादात त्यांनी दुचाकीचे जोरात ब्रेक दाबले. मात्र त्यांची दुचाकी स्लिप होऊन बांगर खाली पडले. या वेळी पाठीमागून आलेल्या एका चारचाकी रिक्षाचे (छोटा हत्ती) चाक त्यांच्या डोक्यावरून गेले. अचानक हा प्रकार घडल्यामुळे रिक्षा चालकालादेखील काय घडते आहे याची कल्पना आली नाही; परंतु बांगर यांच्या डोक्याला हेल्मेट असल्यामुळे सुदैवाने त्यांना कोणतीही गंभीर जखम झाली नाही. यामुळे दुचाकी चालवताना हेल्मेट परिधान करणे किती आवश्यक आहे, हे समोर आले आहे.



# Students drafted for road safety efforts

## Those with NCC, NSS will compulsorily have to help the city's traffic department

Supriya.Dedgaonkar
@timesgroup.com
TWEETS @supriya_mirror

The city traffic department wants to let no stone unturned in its efforts to reach out to people about road safety awareness.

To make Pune's roads safer and its citizens wiser, the department has now made it mandatory for the students associated with the National Cadet Corps (NCC) and National Service Scheme (NSS) to extend a helping hand.

The extra credit that the students from NSS or NCC earn for these extra-curricular activities will now also depend on their partnership with the traffic department. Under this initiative, the students will be expected to manage traffic in their college vicinity, manage the parking spaces in their colleges and prepare traffic signboards.

Rajesh Puranik, police inspector working with the traffic department's counselling cell, told *Mirror*, "The idea behind extending counselling sessions was to create awareness amongst the motorists to wear helmets and follow traffic rules for their own safety and initially the sessions were conducted at the police headquarters. However, action taken on commuters without helmets was reduced and therefore the counselling unit has had to shift focus to youth and college-going students."

"We, therefore, have initiated a joint venture with the deputy director of education and the Savitribai Phule Pune University. We have tied up with around 197 colleges across Pune district to spread the movement and reaching out to 3.5 lakh students in the first phase. The response from the youth so far is amazing. NSS and NCC students will have to compulsorily help the traffic department in spreading the work of traffic safety," he added.



Traffic department has conducted awareness programmes in colleges

So far, while the traffic department has conducted awareness programmes in several major colleges in Pune Municipal Corporation's (PMC) limits and will now be moving on to colleges in the Pimpri-Chinchwad Municipal Corporation (PCMC) limits and in the rural parts of Pune district.

Vijay Narkhede, joint director of the state government's higher education department, said, "All the college authorities have been alerted about the directions received by the traffic department and will have to give their support to the initiative."

As a part of the initiative, the students belonging to NSS and NCC will have to perform 12 activities annually in order to spread awareness and to give their inputs which will later be used by the traffic department.

The students are, however, most excited about visiting several other cities like Mumbai, Delhi, Chennai, and Bengaluru to see and understand how the traffic scenario in other cities is.

Avishkar Derle, an NSS member and a final-year student of BSc Physics studying in Fergusson College, said, "It is a great learning and an opportunity to be directly involved with the traffic department. Initially an awareness session was organised in the college and we have taken it forward from there, be it creating awareness amongst other students or performing skits."

Deepa Bhise, a first-year commerce student and NCC cadet from Modern College, said, "I eventually want to get into the police and this is a step closer. We have already begun with the initiative in and around our college campus, and are trying to reach out to as many people as we can."

# विद्यार्थ्यांनी वाहतुकीच्या नियमांची जागृती करावी

## राजेश पुराणिक : रामचंद्र महाविद्यालयामध्ये रस्ता सुरक्षा सप्ताह कार्यक्रम

*शाळा, महाविद्यालयांमध्ये रस्ता सुरक्षा सप्ताह राबविला जातो, ही बाब कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाहतुकीच्या नियमांची जनजागृती होण्यास मदत होईल.*
**- मारुती भूमकर,** संस्थापक, श्री रामचंद्र भूमकर शिक्षण संस्था

**। वाडेबोल्हाई : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना वाहतूक व्यवस्था व रस्ता सुरक्षा नियम, कायदे, तसेच सतर्क पुणेकर या ॲपची माहिती दिली. वाहनचालकांनी नियमांचे पालन केले पाहिजे. आपली जबाबदारी आणि समाजात वावरत असताना आपले योगदान याचे भान ठेवले पाहिजे, असे मत पुणे शहर वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक राजेश पुराणिक यांनी व्यक्त केले.

लोणीकंद (ता. हवेली) येथील श्री रामचंद्र कॉलेज ऑफ इंजिनीयरिंग महाविद्यालयामध्ये रस्तासुरक्षा जनजागृती अभियान कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी श्री रामचंद्र भूमकर शिक्षण संस्थेचे संस्थापक मारुती भूमकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

रामचंद्र अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश देसाई यांनी प्रास्ताविक केले. प्रा. बिराजदार आणि प्रा. शुभांगी आरबळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. बापू आरकस यांनी आभार मानले.

पुराणिक म्हणाले की, वाहन चालविताना वाहतुकीच्या नियमांचे पालन केले, तर अपघात कमी होण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांनी गावोगावी वाहतूक नियमांविषयी जनजागृती करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. देशामध्ये अपघातामध्येच मृत्युमुखी पडण्याचे प्रमाण जास्त आहे. एका विद्यार्थ्याला एक नियम समजला, तर तो कुटुंबाला नियमांचे महत्त्व सांगतो, ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे, असे त्यांनी सांगितले.

सकाळ – दि. १४ ऑगस्ट, २०१९

# चूक दाखवा आणि बक्षीस मिळवा

## बेशिस्त चालकांबाबत तक्रार करण्याचे पोलिसांचे आवाहन

ब्रिजमोहन पाटील :
@brizpatil

पुणे, ता. १३ : दुसऱ्यांची चूक पकडण्यात आणि कान टोचण्यात पुणेकर एकदम पटाईत आहेत. त्यांच्या याच गुणाचा वापर करून बेशिस्त वाहनचालकांना धडा शिकविण्याचा निर्णय पोलिसांनी घेतला आहे. कोणत्याही वाहतुकीच्या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या वाहनाचा नंबर आणि छायाचित्र 'सतर्क पुणेकर' ॲपवरून पोलिसांना पाठविणाऱ्या तक्रारदाराला बक्षीस दिले जाणार आहे.

> 'गिफ्ट कूपन्स' देऊन शिस्तप्रिय चालकांना सन्मान केला. आता नियमांचे उल्लंघन केल्यानंतर त्याचे छायाचित्र ॲपवरून पाठवावे लागेल. तक्रारी देणाऱ्यांपैकी ५० जणांना 'गिफ्ट कूपन' दिले जाईल व त्यांचे आभार मानले जाणार आहेत. यामुळे बेशिस्त चालकांना वठणीवर आणता येईल.
>
> – डॉ. के. वेंकटेशम, पोलिस आयुक्त, पुणे

शहरात वाहतुकीची शिस्त पाळणाऱ्या वाहनचालकांचा सन्मान करण्यासाठी नुकतीच 'आभार' योजना पोलिसांनी सुरू केली होती. ज्यांच्यावर एकही दंडाची पावती नाही, अशा सुमारे ३६ हजार चालकांना 'गिफ्ट कूपन' देण्यात आले होते. आता पोलिसांनी सिग्नल तोडणे, नो पार्किंगमध्ये गाडी लावणे, ट्रिपलसीट, नो एंट्री, झेब्रा क्रॉसिंग, सीटबेल्ट न लावणे, गाडी चालवताना मोबाईलवर बोलणे, यांसह इतर नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची माहिती देणाऱ्यांना बक्षीस देण्याचे ठरविले आहे.

वाहतूक उपायुक्त पंकज देशमुख म्हणाले, सतर्कवरून ज्या तक्रारी आल्या आहेत, त्याची पडताळणी केली जाईल. त्या योग्य असतील त्यांचेच चलन काढले जाईल. हे गिफ्ट कूपन रोज फक्त ५० जणांना दिले जाईल.



### अशी करा तक्रार

- 'सतर्क पुणेकर' ॲप वापरा
- ॲपवर नियम तोडणाऱ्या वाहनाचे छायाचित्र व नंबर टाका
- छाननीनंतर ई चलनद्वारे बेशिस्त चालकांवर कारवाई
- वाहतूक पोलिस, सीसीटीव्ही नसल्यास नियम तोडल्यास फटका
- पाच हजार जणांकडून ॲप डाऊनलोड

# अॅपद्वारे भरता येणार वाहतूक दंड

## महाराष्ट्र वाहतूक पोलिसांकडून मोबाइल अॅप विकसित

पुणे, दि. २० - महाराष्ट्र वाहतूक पोलिसांनी वाहतूक नियम मोडल्याचा दंड ऑनलाइन पाहण्यासाठी आणि तो भरण्यासाठी मोबाइल अॅप विकसित केले आहे. अॅपमुळे वाहनचालक आता कार्ड किंवा इंटरनेट बँकिंगद्वारे दंड भरू शकणार आहेत. याबाबत शहर वाहतूक शाखेने ट्विटरवर याबाबत माहिती दिली असता पुणेकरांनी 'सोशल मीडिया'वर 'अॅप'चे कौतुक केले.

वाहतुकीच्या नियमांचे पालन न केल्यास वाहतूक पोलिसांकडून दंड करण्यात येतो. वाहतूक विभागाकडून बहुतांश कारवाया सीसीटीव्हीच्या माध्यमातून करण्यात येतात. त्यामुळे अनेकदा वाहनचालकांना त्यांच्या वाहनावर असणाऱ्या दंडाची माहितीच नसते. तसेच, दंड असल्याचे समजल्यास वाहनचालकांना दंड कसा भरायचा, असा प्रश्न पडतो. या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी राज्य वाहतूक विभागाने थेट अॅपद्वारे दंड भरण्याची सुविधा दिली आहे.




### असे जोडले जा अॅपशी...

वाहतूक विभागाकडून 'मुंबई ट्रॅफीक' आणि 'महा ट्रॅफीक' हे अॅप विकसित केले आहेत. हे अॅप 'अॅन्ड्रॉईड'च्या 'प्ले स्टोअर' आणि 'अॅपल'च्या 'आयओएस अॅप स्टोअर'मधून डाऊनलोड करता येते. वापरकर्त्यांनी आपले वाहन अॅपशी जोडण्यासाठी 'माय व्हेईकल' या चिन्हावर 'क्लिक' करावे. त्यानंतर वाहनाचा नंबर आणि वाहनाच्या इंजिन किंवा चासीचे शेवटचे ४ अंक टाकावेत. वाहनावर प्रलंबित असणाऱ्या दंडाची (ई-चलन)ची माहिती घेण्यासाठी 'माय ई-चलन' यावर 'क्लिक' करावे. यानंतर वापरकर्ते प्रलंबित वाहतूक दंडाची रक्कम क्रेडीट/डेबिट कार्ड किंवा ई-बँकिंगद्वारे भरू शकतात.

प्रभात – दि. २९ ऑगस्ट, २०१९

# ४१ दुचाकी वाहनचालकांवर कारवाई

## भारती विद्यापीठ वाहतूक पोलिसांनी १६,४०० रुपयांचा दंड केला वसूल

प्रभात वृत्तसेवा

**कात्रज, दि. २८ -** डी मार्ट मध्ये खरेदी करण्यासाठी आलेल्या ग्राहकांनीपैकी ४१ जणांनी आपल्या दुचाकी रस्त्यावरच पार्क केल्या होत्या. या पार्क केलेल्या गाड्यांवर भारती विद्यापीठ वाहतूक विभागाच्या वतीने कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून १६ हजार ४०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.



कात्रज ते नवले पूल देहूरोड बायपास महामार्गावरील डी मार्ट समोर खरेदीसाठी आलेले ग्राहक भर रस्त्यावरच गाड्या लावत असल्याने वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होते. आज बेशिस्तपणे पार्क केलेल्या दुचाकी वाहने भारती विद्यापीठ वाहतूक विभागाने आधुनिक गाड्या उचलणाऱ्या टेम्पोद्वारे जप्त केला. ही कारवाई भारती विद्यापीठ वाहतूक विभाग पोलीस उपनिरीक्षक बी. जी. घुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी सुनील बांदल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कारवाई केली. यामध्ये ४१ दुचाकी वाहनांवर नो पार्किंगची कारवाई करण्यात आली व १६,४०० रुपये दंड वसूल करण्यात आला.

### वाहनचालकांचे प्रबोधन

भारती विद्यापीठ वाहतूक विभागाच्या हद्दीमध्ये दत्तनगर चौक, चांद्रभागा चौक, त्रिमूर्ती चौक या ठिकाणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे रस्ता सुरक्षा अभियान कार्यक्रम घेण्यात आला होता. वाहनचालकांना वाहतूक नियम पाळण्याबाबत व हेल्मेट वापरणेबाबत प्रबोधन करण्यात आले होते.

“ सध्या दुचाकी उचलण्यासाठी स्वयंचलित वाहने असल्याने वाहतूक कोंडी होणाऱ्या संवेदनशील ठिकाणांहून दुचाकी उचलण्याच्या कारवाईला वेग आला असून नो पार्किंगमध्ये उभ्या असणाऱ्या गाड्यांवर कारवाई करण्यात येत आहे.

**बी. जी. घुमाळ**
वाहतूक विभागाचे पोलीस उपनिरीक्षक

**PuneMirror** - 25 August, 2019

# Slum kids will educate riders on traffic rules

## They will be stationed across Sinhagad Road on Sunday, distributing leaflets that press on norms

Supriya.Dedgaonkar
@timesgroup.com
TWEET @supriya_mirror

The need for traffic awareness achieves a newer clarity every day, as city records many mishaps on the road that result from a causal approach towards rules. This motivation — of disseminating awareness — is at the heart of Swanand Jankalyan Pratishthan, a social group that works closely with children from slums. The organisation has planned an event for Sunday, where kids aged 3-12 will make their presence felt on Sinhagad Road, educating people on road safety.

Around 100 children, with supervision from their parents and volunteers, will be stationed at Dandekar Pul, Naushya Maruti Chowk, Hingne Chowk and Dhayari Phata from 5 pm to 6 pm.

The kids will be equipped with leaflets, explaining the importance of traffic awareness, wearing helmets and keeping off the zebra crossings. The organisation's officials believe that by handing over this task to children, the adult riders will take better notice of the rules they have been violating.

Ravindra Shingnapurkar, one of the leading members of Swanand Jalkayan Sanstha, said, "We have been closely associated with the children staying in the slums for a while now. We conduct several activities for them, out of which most of them ensure overall development and not just academics."

The objective of roping in slum children for various initiatives, according to Shinganapurkar, is to remove them from the confines of the slums, where the crime rate is high. "These children tend to idolise criminals. Our motive is to help these kids adapt to a newer environment that also helps them focus on their studies in a better way," he added.

Be it the traffic awareness programme or anything else, it has generated positive results as even corroborated by the parents. Asha Shinde, whose five-year-old daughter is associated with the organisation, said, "In a short span she has learned so much about the world. From traffic rules to painting, she has an upper hand on all these activities due to the classes that she attends with Swanand group every weekend."

Ten-years-old Aditya Mali, a zilla parishad school student who volunteers with the organisation, had a first-hand experience to recount, said, "On weekends we get to learn so much — about sports, arts and several norms of the government. Every week my siblings and I look forward to this."

Swanand Janakalyan also conducts 24 samruddhi warg (a form of remedial classes) on every Saturday and Sunday in the seva vastees of Sinhagad Road and Kothrud. The traffic initiative stemmed from one of these sessions, which even the police officials believe, will make a difference.

Senior police inspector, Devidas Ghevare, from the Dattawadi division, said, "This initiative will be impactful as, on this rare occasion, children are involved. People will be taken aback if at all they are violating the rules and will give it a thought. It is essential that once in a while such events should be conducted by the public for the public."




Volunteers of Swanand Jankalyan Pratishthan have made placards and leaflets that ask people to not honk, wear seat belts among other things

# अभिप्राय...

મા. વરિષ્ઠ પો. નિરીક્ષક સો.
કોંઢવા પોલીસ સ્ટેશન, પુણે.
યાંના સવિનય સાદર

રિપોર્ટ - શ્રી. એમ. પાડવી પોલીસ ઉપનિરીક્ષક, કોંઢવા પોસ્ટે
યાંજકડુન.

વિષય - દર્પણ પુસ્તકાબાબત.

દર્પણ હા ઉપક્રમ સુરુ ઝાલ્યાપાસુન પોલીસાંની વિભાગ, વ યાંચ્યા કામગીરી બદ્દલ લોકાંના માહિતી મિળતે. યા ઉપક્રમામુળે પોલીસ વ જનતા યાંચ્યાતીલ સંબંધ અધિક સુધારણ્યાસ મદત હોત આહે. જનતેલા વ સામાન્ય લોકાંના પોલીસાંવરચા વિશ્વાસ અધિક બળકટ હોત આહે. મા. પોલીસ આયુક્ત સો. પુણે શહર યાંની સુરુ કેલેલા દર્પણ હા ઉપક્રમ યશસ્વી અસુન તો પોલીસાંસાઠી વ જનતેસાઠી ઉપયુક્ત અસુન મોલાચે માર્ગદર્શક અસા ઠરલા આહે.

મા. સાદર સો.
તા. 18/05/19.
(સહી)
પોલીસ ઉપનિરીક્ષક
કોંઢવા પો. સ્ટે. પુણે શહર

---

**सहकारनगर पोलीस ठाणे**

**दर्पण पुस्तिका अभिप्राय**

१) पोलीस कर्मचारी याचे पुर्ण नाव :- मिनाक्षी जितेंद्र महाडिक

२) पदनाम :- महिला पोलीस नाईक

३) बक्कल नंबर :- ५९९१

४) नेमणुकीचे ठिकाण :- सहकारनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

५) दर्पण पुस्तिकेबाबत आपला प्रतिक्रियात्मक अभिप्राय / मत :-

माननिय महोदय,

दर्पण पुस्तिकांचे वाचन केले. मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांची कल्पना पोलीस दलातील अधिकारी / कर्मचारी, नागरिक यांना उत्कृष्ठ कामगिरी करण्यास प्रोत्साहन देणारी आहे. पोलीस आयुक्तालयांतर्गत येणाऱ्या पो. स्टेश. दाखल गुन्हे, त्यांची शोधण्यात माहिती, तपासाबाबतची माहिती, पोलीसांकडून करण्यात येणाऱ्या चांगल्या कामगिरी दखल या पुस्तिके मार्फत वाचण्यास मिळाली. दर्पण पुस्तिके मार्फत संकलित माहिती पुढे येणाऱ्या पोलीस बांधवांना प्रेरणा देणारी असेल. या पुस्तिकेचा संग्रह होणे आवश्यक आहे असे आवर्जून वाटत आहे. तसेच मा. पोलीस आयुक्त सरांची सदरची संकल्पना दैनंदिन कामकाजाकरिताही उपयोगी ठरेल. धन्यवाद सर.

Mahadik
LPN 5991.
स्वाक्षरी

दिनांक :- २9.०५.२०१९



Man arrested for estranged girlfriend's murder attempt

Will act against illegal private security firms: warns police chief

बिबवेवाडीमध्ये सीसीटीव्हीचे लोकार्पण

बिबवेवाडी पोलिसांनी पाठलाग करून जप्त केली ३५० लिटर दारू

चालक व मालकांवर कारवाई करणार

अश्लील चाळे करणाऱ्या महिलांवर कारवाई

शाखेकडून गुंडांची झाडाझडती

वाहनांची तोडफोड करणारे गजाआड, पाच तासांत अटक

पाच जणांच्या टोळीला अटक

पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याच्या होते तयारीत

मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय

कर्ज फेडण्यासाठी झाला 'तो' साखळीचोर

चार किलो गांजासह आरोपीला अटक

धक्का लागला म्हणून कोयत्याने वार; तिघे जेरबंद

पुरुषांपेक्षा पोलिसांवर महिलांचा विश्वास

महिला सुरक्षेसाठी 'दामिनी टू' पथक

पोलिसांना मदत करणाऱ्या संस्थांचा सन्मान

कमी किमतीत बुलेट देण्याचे आमिष

गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या तिघांना अटक

पोलीस बांधवांप्रति आदराची भावना बाळगा : अमृत पठारे

नात्यांमध्ये सुसंवाद ठेवणे आव्हानात्मक

चोरीला गेलेला मुद्देमाल पुन्हा मिळताच चेहऱ्यावर फुलले हसू

पोलिस ठाण्यांत आता 'सीपीओ'

पोलिस आणि नागरिकांमधील दुवा म्हणून करणार काम; आयुक्तांचा उपक्रम

Cops bust gang for duping finance cos of ₹4.5 crore

सुखकर्ता पुरस्काराचे वितरण उत्साहात

उत्सवात बेशिस्तीचे 'थर' नकोच

एका ढोल ताशा पथकाला एकाच मंडळात सहभागी होता येणार

हरविलेली बालके अखेर विसावली आईच्या कुशीत

नागरिकांच्या वॉर्डस्तरीय निधीतून संपूर्ण शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार

Gang duping people with promise of real American dollars nabbed

अशिक्षितांचा पोलिसांवर विश्वास

सोशल मीडियामुळे सापडला हरवलेला

एका ढोल ताशा पथकाला एकाच मंडळात सहभागी होता येणार

पोलीस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे : विसर्जन

दामिनींनी केले पाकीट परत

सराईत चोरट्याकडून २४ मोबाइल हस्तगत

गुन्हेगारी रोखण्यासाठी नागरिकांचा सहभाग आवश्यक

भरपावसात बालकाला मंदिरात सोडून पित्याचा पळ

विद्यार्थ्यांनी वाहतुकीच्या नियमांची जागृती करावी

राजेश पुराणिक : रामचंद्र महाविद्यालयामध्ये रस्ता सुरक्षा सप्ताह कार्यक्रम

हडपसर पोलीस स्टेशनमध्ये रक्षाबंधन

हेल्मेटमुळे वाचले वाहतूक पोलिसांचे

आईनेच केला चिमुकल्याच्या अपहरणाचा बनाव

गरिबीमुळे सांभाळ अशक्य, म्हणून दिले होते ओळखीच्या दाम्पत्याकडे

इंजिनिअर 'लखोबा लोखंडे' अखेर जेरबंद